'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
## (स्वायत्त)

बी.ए. भाग III सेमिस्टर-6 2020-21

## राज्यशास्त्र विभाग

आकांक्षा प्रकाश ठाणेकर.

पेपर क्र. XIV - DSE 1019 F 3

# भारताचे परराष्ट्र धोरण

प्रकल्प विषय -

## 'भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारवाढी-समोरील आव्हाने'

मार्गदर्शक -

प्रा. डी. ए. पवार

प्रा. एस. ए. फराकटे

# प्रतिज्ञापत्र

आम्ही प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो की, सदरचे संशोधन कार्य आमच्या स्वतःच्या संशोधनकार्याचे फलित आहे. हे संशोधन यापूर्वी कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेले नसून आम्ही स्वतः संशोधन करून तसेच मार्गदर्शकांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आणि संदर्भ साहित्याचा आधार घेऊन करण्यात आले आहे.

ठिकाण : विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

दिनांक : 3 जुलै 2021

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | रोल नं. | सही |
|---|---|---|---|
| 1) | कु. आकांक्षा प्रकाश ठाणेकर | 5624 | [illegible] |
| 2) | कु. तृप्ती सचिन सोमकुवर | 5621 | [illegible] |
| 3) | कु. पूजा मोहन सोनवणे | 5622 | सोनवणे |
| 4) | कु. अमोघ केशव ताशी | 5623 | |
| 5) | कु. सौरभ भाऊसाहेब सासने | 5625 | |

PAGE NO.
DATE:

# ऋणनिर्देश

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर अंतर्गत 'राज्यशास्त्र विभाग' यांच्या मार्गदर्शनाखाली बी.ए.भाग.३ मधील 'पेपर क्र. 14 – भारताचे परराष्ट्र धोरण' या विषयांतर्गत 'भारतीय व्यापारवादीसमोरील आव्हाने' हा प्रकल्प सादर करण्याची आम्हांला संधी मिळाली, त्याबद्दल महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे आम्ही मनस्वी ऋणी आहोत

या प्रकल्पासाठी आम्हांला 'राज्यशास्त्र विभागप्रमुख' प्रा. डी.ए.पवार, समीक्षा कंराकटे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्य आर.आर.कुंभार यांचे वेळोवेळी प्रोत्साहन लाभले. ग्रंथपालांचेही मार्गदर्शन लाभले. सध्या कोरोना महामारीमुळे असलेल्या लॉकडाऊनच्या कारणास्तव इंटरनेटचा वापर झाला.

हा प्रकल्प करताना लाभलेल्या या सर्व गुरुजनांचे, मित्रमैत्रिणी व ज्ञात-अज्ञातांचे आम्ही मनस्वी ऋणी आहोत !!!

PAGE NO.
DATE:

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1. | प्रस्तावना | 1 |
| 2. | उद्दिष्ट्ये | 2 |
| ३. | आंतरराष्ट्रीय व्यापार-संकल्पना | 3 |
| ५. | भारताचे परकीय व्यापार धोरण व परराष्ट्र धोरण | 5 |
| 5. | भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारवाढीसमोरील आव्हाने | 6 |
| ६. | उपाययोजना | 11 |
| ७. | निष्कर्ष | 12 |
| ८. | संदर्भग्रंथसूची | 13 |

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष 2020-21, सेमिस्टर 6 साठी पेपर क्र 14, 'भारताचे परराष्ट्र धोरण' या अंतर्गत 'भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारवाढीसमोरील आव्हाने' हा प्रकल्प सादर करीत आहोत. अगदी अनादी काळापासून 'व्यापार' ही संकल्पना अस्तित्वात असलेली आढळून येते. भारतातून मसाले, कापूस, मौल्यवान धातूंचा व्यापार करणारे अरब असो किंवा भारताचा इतिहास पालटून टाकणारे युरोपीय व्यापारी असो. व्यापार आणि भारत यांचे समीकरण अधोरेखित करावे असेच आहे.

परंतु आज आपल्याला जागतिक व्यापाराचे स्वरूप झपाट्याने बदलत असल्याचे दिसते. बहुतेक सर्वच महत्त्वाच्या देशांची परराष्ट्र धोरणे जागतिक व्यापारावर परिणाम करताना दिसतात. भारताचा व्यापारही भारताच्या परराष्ट्र धोरणातील महत्त्वाचा आणि कळीचा मुद्दा असलेला दिसून येतो.

विशेषत: स्वातंत्र्यानंतर भारताच्या व्यापारी धोरणात बदल झाला. सुरवातीला अलिप्ततावादी धोरण स्वीकारले असले तरी नंतरच्या काळात अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. आणि त्यातूनच भारताचे आंतरराष्ट्रीय व्यापार क्षेत्रात अढळ स्थान निर्माण झाले आहे. परंतु या प्रक्रियेत व्यापारवृद्धीसमोर अनेक आव्हाने आहेत. त्या आव्हानांचा अभ्यास करणे, महत्त्वाचे बनले आहे. म्हणून या प्रकल्पाअंतर्गत आंतरराष्ट्रीय व्यापारवाढीसमोरील आव्हानांचा अभ्यास करीत आहे.

# उद्दिष्ट्ये

'भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारवाढीसमोरील आव्हाने' या प्रकल्पाची कार्यवाही करत असताना खालील उद्दिष्ट्यांचा विचार करणे, क्रमप्राप्त ठरते.

1) आंतरराष्ट्रीय व्यापाराची संकल्पना समजून घेणे.

2) भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची पार्श्वभूमी समजून घेणे.

3) भारताचे परकीय व्यापारी धोरण व परराष्ट्र धोरण यांचा आढावा घेणे.

4) भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारवाढीसमोरील आव्हाने अभ्यासणे.

5) उपाययोजनांच्या संदर्भात आढावा घेणे.

6) या सर्व अभ्यासातून योग्य तो निष्कर्ष काढणे.

# आंतरराष्ट्रीय व्यापार

**(संकल्पना)**

देशाच्या भौगोलिक सीमांतर्गत चालणारा व्यापार म्हणजे अंतर्गत किंवा देशी आणि देशादेशांमध्ये चालणारा आयात-निर्यातीचा व्यापार म्हणजे परदेशी किंवा 'आंतरराष्ट्रीय व्यापार' असे स्थूलमानाने म्हणता येईल. या दोन्ही प्रकारांत वस्तू आणि सेवा यांचा अंतर्भाव आहे.

'व्यापार' हा प्राचीन काळापासून विविध देश एकमेकांशी करतात. आधुनिक काळात 'व्यापार' हा प्रमुख घटक परराष्ट्र धोरणाच्या प्रक्रियेत असून यावरून परराष्ट्रीय धोरणाची दिशा ठरत असते. व्यापारामध्ये विदेशी किंवा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा देशाच्या धोरण निश्चितीवर विशेषतः परराष्ट्र धोरण निश्चितीवर प्रभाव पडत असतो.

विदेशी व्यापार म्हणजे दोन भिन्न-भिन्न राष्ट्रांतील व्यक्तींनी एकमेकांशी वस्तू व सेवा घेण्यासंबंधी केलेली देवाणघेवाण होय. यात निर्यात व आयात हे प्रमुख व्यापार असून पुनर्निर्यात हाही व्यापाराचा प्रकार अलीकडे विकसित झाला आहे.

# भारताचे परकीय व्यापार धोरण व परराष्ट्र धोरण

भारताच्या परकीय व्यापार धोरणातूनच भारताच्या परराष्ट्र धोरणाची दिशा स्पष्ट होते. स्वातंत्र्य-पूर्वकाळामध्ये भारताचे परकीय व्यापार धोरण पुर्णपणे ब्रिटीश सरकारच्या मर्जीवर अवलंबून होते. या धोरणात ब्रिटीश साम्राज्यवादाला अनुसरून कार्य होत होते. त्यामुळे त्याचा विकास झाला नाही, तसेच ब्रिटीशांच्या साम्राज्य-वादी धोरणामुळे भारताचे परराष्ट्र धोरणही मर्यादित राहिले.

स्वातंत्र्यानंतर भारतीय व्यापारी धोरणात बदल झाला. भारताला आपला विकास करण्यासाठी विदेशी व्यापाराची गरज निर्माण झाली, त्यामुळे भारताने सुरवातीच्या काळात परराष्ट्र धोरणात 'अलिप्तता' स्वीकारली. व जागतिक राजकारणात दोन्ही गटांत सामील न होता दोन्ही गटांकडून मदत मिळवण्याचे धोरण अवलंबले व त्यानुसार भांडवलशाही व साम्यवादी गटांतील देशांशी व्यापार धोरण राबविले. या व्यापारी धोरणात देशांतर्गत निर्यातक्षम उद्योगांना प्रोत्साहन दिले. स्वदेशी मालास प्राथमिकता देताना इतर देशांबरोबर द्वीपक्षीय व बहुपक्षीय करार केले. तसेच 1962 ला आयात पर्यायी धोरण स्विकारले.

PAGE NO:
DATE:

1980 नंतर भारतीय व्यापारी धोरणात बदल झाला, तसेच परराष्ट्र धोरणही बदलले. 1985 ला प्रथमच त्रिवर्षीय 'आयात - निर्यात धोरण' जाहीर केले, ज्यात निर्यातवृद्धीला प्राधान्य देण्यात आले. 1991 ला आर्थिक सुधारणा लागू केल्यानंतर प्रथम 1992-97 ला पहिले पंचवार्षिक आयात - निर्यात धोरण घोषित केले गेले. या धोरणात 'उदात्तीकरण व स्वावलंबन' हा मुख्य उद्देश होता. या धोरणामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात बदल झाला व व्यापारी उद्देशाने भारताने 'फोकस लॅटिन अमेरिका' धोरण स्वीकारले. तसेच दुसरे आयात - निर्यात व्यापारी धोरण 1997 - 2002 ला जाहीर झाले. या धोरणामुळे भारताने 'फोकस सी.आय.एस' ही योजना कार्यान्वित केली. तसेच 'लुक-ईस्ट पॉलिसी' जाहीर केली. ज्यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात आसियान देशांना महत्त्व प्राप्त झाले, त्यांच्याविषयी धोरण ठरवण्यास सुरवात झाली.

2004-09 मध्ये नवीन असे 'परकीय व्यापार धोरण' जाहीर झाले. या व्यापार धोरणामध्ये परकीय चलनाप्रमाणेच 'आर्थिक वृद्धी' निर्माण करणे, निर्यातीत जागतिक हिस्सा वाढवण्याचे धोरण होते. या धोरणामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात आफ्रिका खंडातील देशांबद्दल व्यापारी दृष्टीकोन अवलंबला गेला व देशांशी संबंध दृढ करायला सुरवात केली. भारताच्या व्यापार जगातील विविध देशांशी वाढू लागल्याने भारतीय परराष्ट्र धोरणातील काही देशांशी असलेल्या संबंधांवरही प्रभाव पडू लागला.

व्यापारी उद्देशाने स्थापन झालेल्या जागतिक व्यापार संघटनेचा (WTO) भारत सदस्य असून या संघटनेच्या अटींचाही प्रभाव पडताना दिसतो.

# भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारवाढीसमोरील आव्हाने –

## १) व्यापार सुलभ करार, १९१७ →

जागतिक व्यापार संघटनेने (WTO) २२ फेब्रुवारी १९१७ रोजी व्यापार सुलभ करार स्विकारला आणि भारतासाठी जशा संधी उपलब्ध झाल्या तशी दीर्घकालीन आव्हानेही निर्माण झाली.

अधिक तीव्रतेने आयात होण्याची भिती या करारामुळे उद्भवली आहे. तब्बल ४ वर्षांच्या प्रदीर्घ वाटाघाटीनंतर हा करार स्विकारला गेला असल्याने त्याची तीव्रता आपल्या लक्षात येईल. जागतिक पातळीवर संयुक्त राष्ट्रसंघाच्या बहुतेक सर्व सभासद राष्ट्रांनी हा करार स्विकारल्यामुळे व्यापारसुलभता निर्माण झाली.

आणि यातून भारनाला उद्भवलेला धोका म्हणजे निर्यातीपेक्षा आयातीचे प्रमाण वाढले आणि त्यामुळे व्यापार तोल असंतुलित होताना हिसत आहे.

PAGE NO.
DATE:

## २) गॅट करार, 1947 -

'जनरल ॲग्रिमेंट ऑन ट्रेड ॲन्ड टेरिफ' (गॅट) करार भारताने 1947 मध्ये स्वीकारला त्याच्या आव्हानातुन भारत होरपळून निघाला, याचे प्रमुख कारण म्हणजे हा करार किंवा त्यातून निर्माण झालेल्या संधीकडे डोळेझाक झाल्यामुळे या कराराचा म्हणावा तितका फायदा न होता इतर जागतिक व्यापारात अग्रेसर राष्ट्रांनी आपली बाजारपेठ काबिज केली.

## ३) आंतरराष्ट्रीय करारांबद्दलची अनभिज्ञता -

वरील दोन करारांसदर्भात तसेच इतर आंतरराष्ट्रीय करारांबाबत म्हणावी तितकी माहिती भारतीय बाजारपेठेला नसल्यामुळे आज भारताची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमधील स्थिती आव्हान बनून उभी ठाकली आहे.

गेल्या दोन दशकात बोटावर मोजण्या-इतक्या इंडस्ट्री सोडल्यास कोणीच याचा फायदा घेतला नाही त्यामुळे आजच्या स्थितीत आपणाला विविध आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. चीन, अमेरिका यांच्यापाठोपाठ युरोपनेही भारतीय बाजारपेठ काबिज केलेली आहे. आपण मात्र याबाबतीत अनभिज्ञच आहोत व त्यामुळे व्यापाराच्या क्षेत्रात म्हणावी तेवढी प्रगती करता आलेली नाही.

# ५) आर सीईपी करार -

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गेल्या काही वर्षांत 'रिजनल कॉम्प्रेहेन्सिव्ह इकॉनॉमिक पार्टनरशिप' (RCEP) या कराराची चर्चा आहे, ती त्या कराराची अंमलबजावणी अजूनपर्यंत होऊ शकलेली नाही या कारणामुळे.

यामध्ये 'आसियान'च्या 10 सदस्यांसह भारत, जापान, चीन, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड हे सहभागी देश आहेत. भारतासाठी या करारात सहभागी होणे, हे मोठेच आव्हान असणार आहे. विषमता हा या 16 देशांच्या संघटनेतील महत्त्वाचा अडथळा आहे.

भारताचा विचार केल्यास भारतात इलेक्ट्रॉनिक डेटा शेअरिंग व लोकल डेटा स्टोअरेज ही सर्वांत मोठी समस्या आहे. सुरक्षा कारणांमुळे, राष्ट्रहित व गोपनीयतेच्या दृष्टीकोनातून ही माहिती उघड करणे सोपे नाही, त्यामुळे अडचणी येणे, गृहितच आहे. भारत आरसीईपी मध्ये सहभागी झाल्यास घरगुती उत्पादनांवर परिणाम होईल, असे बँक ऑफ इंडियाने दिलेल्या अहवालात म्हटले आहे.

2018-19 मध्ये आरसीईपीच्या 15 पैकी 11 सदस्य देशांसोबतचा भारताचा व्यापार तुटीचा राहिला आहे. 2018-19 मध्ये भारताची व्यापार तूट 184 अब्ज डॉलर होती. जेनेरिक औषधांच्या सुलभतेबरोबरच, खाणीतून मिळणारा नफा, पाणी, उर्जा, परिवहन आणि टेलिकॉमच्या खाजगीकरणाच्या प्रमुख अडचणी आहेत. शेती, इतर व्यवसायांवरही आव्हानात्मक परिणाम उद्भवू शकतात.

PAGE NO.
DATE:

## ५) जी.एस.टी.चा आंतरराष्ट्रीय व्यापारावरील परिणाम –

भारतात 'वस्तू आणि सेवा करप्रणाली' च्या नव्या पद्धतीचे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर खूप खोलवर आणि मूलभूत परिणाम झालेले दिसतात आणि येत्या काळासाठी या गोष्टी एक आव्हान असणार आहेत.

जी.एस.टी मुळे भारताच्या आयात आणि निर्यात करांच्या रचनेत बदल झालेले आहेतच पण काही महत्त्वाचे अप्रत्यक्ष कर रद्द केल्यामुळे व्यापाराची रचनाच बदलली आहे व हेच जीएसटी मुळे कररचनेत आलेले बदल आंतरराष्ट्रीय व्यापार-समोरील आव्हान आहे.

## ६) जागतिक पुरवठा साखळी –

जागतिक पुरवठा साखळी हे आज एक आंतरराष्ट्रीय व्यापारसमोरील महत्त्वाचे आव्हान आहे. जागतिक पुरवठा साखळी म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर ठराविक कंपनीची व्यापारी मक्तेदारीची साखळी. 'जास्तीत जास्त नफा आणि कमीत कमी नुकसान' या तत्वावर चालणाऱ्या या कंपन्यांनी बाजारपेठा काबिज केल्या आहेत, त्यामुळे व्यापाराच्या क्षेत्रात या कंपन्यांची मक्तेदारी निर्माण होऊन त्याचा परिणाम भारताच्या व्यापारावर होताना दिसत आहे.

PAGE NO.
DATE:

## ७) शेती व्यवसायाचा प्रभाव -

आजही भारताच्या संदर्भात विचार केल्यास बहुतांश लोकसंख्या शेती व शेतीशी निगडित व्यवसायांमध्ये गुंतली आहे. आणि या शेतीचे स्वरूप व्यावसायिक अथवा व्यापारी नसून उदरनिर्वाहासाठीचे आहे व त्याचा परिणाम शेती उत्पादनांची म्हणावी तितकी निर्यात होत नाही व शेतीत गुंतलेल्या लोकसंख्येमुळे औद्योगिकिकरणाचे प्रमाणही मर्यादित राहते व व्यापारतोल ढासळतो.

शेती मध्ये पुरेशा प्रमाणात नवीन तंत्रज्ञान उपलब्ध नसल्यामुळे उत्पादनही कमी प्रमाणात होते व याचा परिणाम म्हणजे व्यापारा-समोर शेतीव्यवसाय आव्हान म्हणून उभे आहे.

## ८) अपुरे तंत्रज्ञान -

भारतात विशेषतः औद्योगिकक्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव असल्याचे दिसून येते. त्यामुळे जेवढे मनुष्यबळ वापरले जाते, त्या मानाने तेवढ्या प्रमाणात निर्यात योग्य उत्पादन होत नाही. म्हणून हे एक आव्हान असल्याचे दिसून येते. अपुऱ्या तंत्रज्ञानामुळे जागतिक बाजारपेठेशी स्पर्धा करणे भारतासाठी आव्हान आहे.

PAGE NO.
DATE:

# उपाययोजना

भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासमोरील आव्हानांचा अभ्यास केल्यानंतर खालील उपाययोजना करणे, आवश्यक वाटते.

1. विविध प्रकारच्या आंतरराष्ट्रीय व्यापारी करारांबाबत अनभिज्ञता असलेली दिसते. त्यामुळे म्हणावा तितका फायदा करून घेता येत नाही. उलट तोटा/नुकसान सहन करावे लागते. यावर उपाय म्हणून व्यापारी करारांबद्दलची साक्षरता आवश्यक आहे.

2. भारतात तंत्रज्ञान विशेषत: आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या विकास होणे, आवश्यक आहे. ज्यामुळे या आव्हानांना तोंड देणे काहीसे सुलभ होईल.

3. शक्य तितक्या प्रमाणात भारतीय उत्पादने वापरून आयातीवर (अनिश्चित) नियंत्रण ठेवले पाहिजे.

4. विविध प्रकारच्या सवलती, अनुदाने यांच्या-द्वारे सरकारने व्यापार क्षेत्राला चालना दिली पाहिजे.

# निष्कर्ष

अंतरराष्ट्रीय व्यापारासमोरील आव्हाने त्याच्या वरील उपाययोजना यांचा अभ्यास केल्यानंतर खालील निष्कर्षापर्यंत पोहोचता येते →

1. सद्यस्थितीत आंतरराष्ट्रीय बजारपेठेत भारत म्हणावा तितका यशस्वी नाही, त्यासाठी व्यापार क्षेत्रास चालना देणे, गरजेचे आहे.

२. सध्या जरी व्यापाराच्या क्षेत्रात त्रुटी असल्या तरी योग्य त्या उपाययोजनांचा वापर करून आपण व्यापार भरभराटीस आणू शकतो.

३. आज भारतात आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर विकास झालेला दिसून येतो, हा व्यापार विकासाच्या दृष्टीने आशेचा किरण आहे.

४. आज बऱ्याच शासकीय योजना आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने सकारात्मक आहेत. त्यामुळे व्यापारावर सकारात्मक परिणाम होतील, हे निश्चित.

थोडक्यात, आज जरी व्यापारासमोर असंख्य आव्हाने असतील, तरी त्यावर मात करून आपण अग्रेसर राहू, हे नक्की.

PAGE NO.
DATE:

# संदर्भ ग्रंथसूची


1) भारताचे परराष्ट्र धोरण - दूर शिक्षण केंद्र,
(एम. ए. भाग -I) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2) मराठी विश्वकोश
(https://vishwakosh.marathi.gov.in)

3) आंतरराष्ट्रीय व्यापार - संधी आणि आव्हाने
-प्रा. गणेश हिंगमिरे (e-sakal)

4) Indian Global trade share - (27 Nov, 2019)
Ministry of commerce & industry

5) 'India, People and economy' - NCERT book
for Geography (std-XII)

PAGE NO.
DATE:

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, 1) कु. आकांक्षा प्रकाश ठाणेकर, 2) कु. तृप्ती सचिन सोमकुवर 3) कु. पुजा मोहन सोनवणे 4) अमोघ केशव ताशी 5) सौरभ भाऊसाहेब सासने या विद्यार्थ्यांनी 'राज्यशास्त्र' या विषयांतर्गत सादर प्रकल्प अहवाल 'भारताचे परराष्ट्र धोरण' या पेपर मधील 'आंतरराष्ट्रीय (भारताच्या) व्यापार-वाढीसमोरील आव्हाने' हा आमच्या पर्यवेक्षणाखाली व मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे. माझ्या माहिती-प्रमाणे हा प्रकल्प अहवाल यापूर्वी कोणत्याही पदवीसाठी सादर केला गेलेला नाही.

ठिकाण - विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

दिनांक - 3 जुलै 2021

प्राचार्य
आर. आर. कुंभार

मार्गदर्शक
प्रा. डी. पी. पवार
HEAD
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

``ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार":-
शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे.

विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर.

शैक्षणिक वर्ष :- २०२०-२०२१

वर्ग:- बी.ए. भाग ३ राज्यशास्त्र विभाग.

सेमिस्टर - 6

पेपरचे नाव:- महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था. (पेपर नंबर 15)

प्रकल्प विषय :- महानगरपालिकेच्या समित्यांची भूमिका.

मार्गदर्शक :(१) प्रा. डी. ए. पवार. (२)प्रा. एस. ए.फराकटे.

नाव :अमोघ केशव ताशी.

रोल नं :- ५६२३.

ऋणनिर्देशक:-

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या व विवेकानंद महाविद्यालय (स्वायत्त)अंतर्गत बी.ए. भाग ३ मधील राज्यशास्त्र शिकत असताना महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था पेपर मधील महानगरपालिका यांच्या विविध समित्यांच्या भूमिकेबाबत प्रकल्प सादर करण्याची संधी मिळाली याबद्दल आम्ही स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था यांच्या विवेकानंद महाविद्यालय (स्वायत्त )कोल्हापूर यांचे ऋणी आहोत. माहिती सादर करण्याची संधी मिळाली यामुळे आम्ही प्राचार्य श्री आर. आर. कुंभार सर त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. श्री. डी. ए. पवार सर ,सहाय्यक प्राध्यापिका एस ए फराकटे मॅडम ,विद्यार्थी मित्र ,माझ्या प्रकल्पात सहभागी असणारे विद्यार्थी आणि ग्रंथपाल तसेच ग्रंथालयातील सेवक यांचे आभार मानतो सर्वांनी वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केल्याबद्दल आम्ही ऋणी आहोत

प्रतिज्ञापत्रः-

आम्ही प्रतिज्ञा पूर्व घोषित करतो की सदरचा प्रकल्प आमच्या प्रयत्नांचे फलित आहे. हे संशोधन यापूर्वी कोणत्याही पदवीसाठी सादर केले नसून आम्ही संशोधन करून तसेच प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली आणि संदर्भ ग्रंथाच्या आधार घेऊन तयार करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | संशोधक विद्यार्थ्यांची नावे | रोल नंबर | सही |
|---|---|---|---|
| | | | |
| १. | अमोघ केशव ताशी | ५६२३ | Amogh |
| २. | तृप्ती सचिन सोमुकावार | ५६२१ | [signature] |
| ३. | पूजा मोहन सोनवणे | ५६२२ | |
| ४. | आकांक्षा प्रकाश ठाणेकर | ५६२४ | |
| ५. | सौरभ भाऊसाहेब सासने | ५६२५ | |

अनुक्रमणिका:-

(१) प्रस्तावना

(२) ७४ वी घटना दुरुस्ती चा परिचय

(३)महानगरपालिकेची रचना आणि परिचय

(४) स्थायी समितीची रचना

(५) स्थायी समितीची भूमिका आणि कार्ये

(६) निष्कर्ष

प्रस्तावना :-

७४ वी घटनादुरुस्ती १९९३ : १९९३ साली ७४ वी घटनादुरुस्त होऊ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे त्यांना संविधानाचे संरक्षण मिळाले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर घटनाकारांनी स्थानिक शासन' हा विषय राज्यसूचीत समाविष्ट केला होता. त्यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थावर राज्यशासनाचे नियंत्रण अधिक प्रमाणात होते. राज्यशासनाच्या इच्छेप्रमाणे नागरी स्वराज्य संस्थांचा कारभार चालत असे. तेव्हा नागरी स्थानिक संस्थांना अधिक स्वायत्तता व बळकटी मिळवून देणे गरजेचे झाले. नागरी स्थानिक संस्थांच्या कारभारातील राज्यशासनाचा वाढता हस्तक्षेप थांबविणे आवश्यक होते. त्या दृष्टीने केंद्र सरकारने वेळोवेळी समित्या नियुक्त करून त्यावर उपाययोजना सुचविण्याचे प्रयत्न चालू ठेवले होते. १९७७ साली अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती. पंचायत राज्यव्यवस्था अधिक सक्षम व स्थिर करण्यासाठी ह्या समितीने अनेक महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या होत्या. परंतु जनता सरकार १९७९ साली सत्तेवरून दूर गेल्यामुळे या समितीच्या शिफारशी बाजूला पडल्या. १९८६ साली पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रेरणेने एल. एम. सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने पंचायत राज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून द्यावा आणि त्यांना घटनात्मक संरक्षण द्यावे अशी महत्त्वपूर्ण शिफारस केली होती. १९८९ साली नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनालक दर्जा देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने ६५ वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांत मांडले. परंतु राज्यसभेने ते विधेयक फेटाळले.

१९९१ साली पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी पंचायत राज्यसंस्थांना घटनात्मक दर्जा मिळवून देण्यासाठी ७३ वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत मांडले. राज्यसभा व लोकसभा यांनी या विधेयकाला मंजुरी दिली. त्यानंतर देशातील निम्म्यापेक्षा जास्त विधानसभांची मान्यता मिळाली. २० एप्रिल, १९९३ रोजी राष्ट्रपतींच्या संमतीने ते विधेयक मंजूर झाले. १ जून, १९९३ पासून ह्या विधेयकाची कार्यवाही सुरु झाली.

७४ व्या घटनादुरुस्तीमुळे 'नगरपालिका' या शीर्षकाखाली (भाग ९-अ) राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आला. यामध्ये २४३ (त) ते २४३ (य छ) कलमांत नगरपालिकासंबंधीच्या सुधारणा मंजूर करण्यात आल्या.

महानगरपालिका (Municipal Council) प्रास्ताविक : नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील महत्त्वाची सर्वोच्च संस्था म्हणजे महानगरपालिका होय. तीन लाखांहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या मोठ्या शहरांसाठी महानगरपालिका स्थापन करण्यात येते. महानगरपालिका स्थापन करण्याचा' अधिकार महाराष्ट्र शासनास असतो. महाराष्ट्रात पुढील महानगरपालिका अधिनियम

अस्तित्वात आहेत.

१. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८.

२. नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९.
४. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ ५. महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुमती) अधिनियम, १९९४.

वरीलपैकी १९९४ च्या महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा अधिनियमानुसार महाराष्ट्रातील नागरी स्वराज्य संस्थांचा कारभार चालतो. महाराष्ट्रात सध्या २२ महानगरपालिका आहेत. मुंबई शहर, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, ठाणे, उल्हासनगर, मीरा-भाईंदर, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, मालेगाव, अमरावती, औरंगाबाद, नागपूर, अकोला, जळगाव, धुळे, अहमदनगर, भिवंडी-निजामपूर, नांदेड-वाघाळा, कोल्हापूर, सोलापूर, सांगली-मिरज-कुपवाड इत्यादी २२ महानगरपालिका सध्या कार्यरत आहेत.

रचना : महानगरपालिका ही एक निगम निकाय (एक व्यक्तिभूत संस्था असून तिला कायद्याने स्वतंत्र अस्तित्व असते. तिला स्वतःचे नाव, नावाचा शिक्का असतो. तिला संपत्ती संपादन करण्याचा, विल्हेवाट लावण्याचा आणि करार करण्याचा अधिकार असतो. महानगरपालिका दुसऱ्यावर दावा दाखल करु शकते आणि तिच्यावर इतरांना दावा दाखल करता येतो.

१. स्थायी समिती
मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये कलम 20 प्रमाणे प्रत्येक महानगरपालिकेचे स्थायी समिती नियुक्त करण्याचा अधिकार असतो. स्थायी समितीत महानगरपालिकेच्या 16 सदस्यांचा समावेश असतो. या समितीस वैधानिक समितीच्या दर्जा असतो दरवर्षी या समितीचे निम्मे सदस्य निवडून निवृत्त

होतात आणि तेवढेच सदस्य घेतले जातात. त्यामुळे ही समिती अखंडपणे काम करणं ही समिती आहे. स्थायी समितीत निवृत्त झालेले सदस्य पुन्हा पुढील वर्षी स्थायी समितीवर सदस्य अपात्र असतात. स्थायी समितीचे सर्व सदस्य आहे. महानगरपालिकेचे निर्वाचित सदस्य असतात. महानगरपालिकेच्या निर्वाचित सदस्यांकडून स्थायी समितीच्या सदस्यांची निवड होत असते. कलम २१ प्रमाणे स्थायी समितीचे सदस्य आपल्या पहिल्या बैठकीत आपल्या पैकी एका सदस्याची सभापती म्हणून निवड करतात. राजकीयदृष्ट्या स्थायी समितीचे सभापती पद हे महापौरांच्या खालोखाल महत्त्वाचे असते. स्थायी समिती सभापती चा कार्यकाल एक वर्षाचा असतो मुदतपूर्व सभापती आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतो. रिक्त झालेले सभापती पदार्थ एकाच उरलेल्या कालावधीसाठी सभापती म्हणून पुन्हा निवडून देण्यासाठी पात्र असतो. महापालिकेत सचिव हा स्थायी समितीचे सचिव म्हणून काम पाहत असतो. स्थायी समितीची सभा आठवड्यातून किमान एक वेळा घेतली जाते. आवश्यकता भासल्यास विशेष सहभाग बोलता येते करण्यासाठी किमान पाच सदस्य हजर राहावे लागतात. कलम २२ व २३ प्रमाणे स्थायी समितीचा एखादा सदस्य सलग दोन महिन्यांच्या कालावधीसाठी तिच्या सभांना गैरहजर राहिला किंवा कोणत्याही कारणामुळे सलग चार महिन्याच्या कालावधीत तिच्या सभांना पूर्व पूर्व मंजुरीशिवाय अनुपस्थित राहिला तर त्याचे स्थायी समितीचे सदस्यत्व संपुष्टात येते. अशा वेळी रिक्त झालेल्या नव्या सदस्यांची नेमणूक करून उर्वरित काळासाठी भरली जाईल. त्यानुसार स्थायी समितीचा एखाद्या महत्त्वाच्या विषयासाठी विशेष समिती किंवा उपसमिती स्थापन करण्याचा अधिकार राहील स्थायी समिती आपले काही अधिकार अशा विशेष समितीला किंवा उपसमिती ला देऊ शकते.

समिती आपले काही अधिकार स्थायी समितीचे अधिकार कार्य :-

१. महानगरपालिकेच्या आयुक्ताला महत्त्वाच्या कामामध्ये स्थायी पूर्वी याची लागते. २. महानगरपालिकेचा अर्थसंकल्प तयार करताना स्थायी समितीच्या लागते.

स्थायी समिती अर्थसंकल्पावर विचारविनिमय करून तो अर्थसंकल्प महापालिकेस सादर करते. ३. महानगरपालिकेतील आयुक्त, उपायुक्त, सहायक आयुक्त शहर अभियंता इत्यादी अधिकाऱ्यांना स्थायी समितीच्या आदेशांचे पालन करावे लागते. आपले अधिकार या त्यांना स्थायी समितीची मान्यता घ्यावी लागते.

४. महानगरपालिकेच्या सेवकवर्गावर स्थायी समितीचे नियंत्रण व देखरेख असते. ५. महानगरपालिकेचा आयुक्त स्थायी समितीच्या पूर्वसंमतीने काही कर्मचा-यांची हंगामी नेमणूक करू शकतो. ६. महानगरपालिकेची विशेष सभा बोलाविण्यासाठी स्थायी समितीच्या किमान चार

सदस्यांनी लेखी मागणी केल्यावर महापौर विशेष सभा बोलावू शकतो.

७. महानगरपालिकेच्या प्रत्येक सभेची पूर्वसूचना तिच्या सर्व सदस्यांना किमान सात दिवस अगोदर देणे बंधनकारक असते. परंतु तातडीच्या प्रसंगी स्थायी समितीच्या किमान तीन सदस्यांनी लेखी मागणी केली असेल तर अशी सभा तीन दिवसांच्या पूर्वसूचनेने बोलाविता येते.

२. परिवहन समिती (The Transport Committee)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये कलम २५ ते २९ मध्ये परिवहन



समितीची निर्मिती, रचना, अधिकार व कार्य यांची तरतूद केलेली आहे. महानगरपालि परिवहन उपक्रम संपादन किंवा स्थापन केला असेल तर तो चालविण्यासाठी परिवहन समिती निर्मिती करण्यात येते. परिवहन समितीमध्ये महानगरपालिकेचे १३ सदस्य असतात. त्या निवड महानगरपालिकेच्या सदस्यांकडून केली जाते. ज्या व्यक्तींना प्रशासनाचा किंवा परिवहन अनुभव आहे आणि ज्यांच्याकडे अभियांत्रिकी, औद्योगिक, वाणिज्य, आर्थिक किंवा प्रशासनविषयी क्षमता आहे अशा व्यक्तीमधून महानगरपालिका १२ सदस्यांची परिवहनम निवड करते. हे सदस्य महानगरपालिकेचे निर्वाचित सदस्य असू शकतील किंवा असू शक नाहीत. स्थायी समितीचा अध्यक्ष परिवहन समितीचा पदसिद्ध सदस्य असतो. परिवहन समित सदस्य महानगरपालिकेचा सदस्य असेल आणि तो महानगरपालिकेच्या सदस्य पदावरून झाला असेल तर त्याचे परिवहन समितीचे सदस्यत्व रद्द होते. परिवहन समितीचे १/२ सदम दर दोन वर्षांनी निवृत्त होतात; आणि तेवढेच नवीन सदस्य घेतले जातात. निवृत्त झाले सदस्य दुसऱ्या वेळी परिवहन समितीचा सदस्य म्हणून घेण्यास पात्र असतो.

परिवहन समितीचे सदस्य आपल्यांमधून एका सदस्याची सभापती म्हणून निवड करतात सभापतीचा कार्यकाल एक वर्षाचा असतो. परंतु पुन्हा सभापती म्हणून त्याची निवड करता येते. एखाद्या सभापतीचे

परिवहन समितीचे सदस्यत्व संपुष्टात आले असेल तर त्याचे सभापती पद संपुष्टात येते. एखाद्या सभापतीने राजीनामा दिल्यास किंवा अन्य कारणाने त्याने सभापती पद सोडल्यास त्याच्या जागी सभापती म्हणून दुसऱ्या सदस्यांची निवड परिवहन समितीच्या सदस्यांकडून पूर्वीच्या सभापतीच्या उर्वरित कालासाठी होते. परिवहन समितीचा एखादा सदस्य सलग दोन महिने या समितीच्या बैठकींना परवानगी न घेता हजर राहिला नसेल किंवा सलग चार महिने परवानगीशिवाय किंवा परवानगी घेऊन अनुपस्थित राहिला असेल तर त्याचे सदस्यत्व संपुष्टात येते. या किंवा अन्य कारणाने त्याचे सदस्यत्व रद्द झाले असेल तर त्याच्या ठिकाणी परिवहन समिती दुसऱ्या नवीन सदस्याची निवड त्याच्या उर्वरित कालासाठी करते.

परिवहन समिती आपल्या कार्यात सुलभता व कार्यक्षमता आणण्यासाठी उपसमित्या नियुक्त करू शकते. आपल्या सदस्यांच्या २/३ बहुमताने परिवहन समिती उपसमित्यांना आपले काही अधिकार व कार्ये सोपविते आणि त्यांच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करून देते. परिवहन समितीच्या सदस्यांना बैठकींना उपस्थित राहण्यासाठी योग्य स्वरूपाचा वाहन भत्ता दिला जातो. ३. प्रभाग समित्या (Wards Committees)

१९९३ साली झालेल्या ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २९ (अ) अन्वये महानगरपालिकेच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रभाग समित्या स्थापन केल्या जातात. एकाच प्रभाग समितीत समाविष्ट करण्यात आलेले प्रभाग सलग (संलग्न) असावे लागतात. कोणत्या प्रभाग समितीत कोणत्या प्रभागाचा समावेश करावयाचा यासंबंधीचा अधिकार महानगरपालिकेला देण्यात आलेला आहे. शहराच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रभाग समित्यांची संख्या पुढीलप्रमाणे ठरविण्यात येते.

प्रत्येक प्रभाग समितीमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश केला जातो. १. प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रातील निवडणूक प्रभागाचे प्रतिनिधित्व

महानगरपालिका सदस्य,

२. प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्राचा प्रभारी अधिकारी, -

३. प्रभागात मतदार म्हणून नोंद असलेले जास्तीतजास्त तीन सदस्य. हे सदस्य समाज कल्याणाची कार्ये करणाऱ्या स्वयंसेवी संघटनेत व अशासकीय संघटनेत कार्य केलेले अनुभवी असावे लागतात. त्यांच्या नामनिर्देशनाची शिफारस संबंधित प्रभाग समितीच्या पालिका सदस्यांनी केली पाहिजे.

प्रभाग समितीचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. या प्रभाग समितीतील निर्वाचित पालिका सदस्य आपल्यातून एकाची समितीचा सभापती म्हणून निवड करतात. अशा निवडलेल्या सभापतीचा कार्यकाल एक वर्षाचा असतो. परंतु त्याचे महानगरपालिकेचे सदस्यत्व संपुष्टात आल्यानंतर लगेचच त्याचे अध्यक्षपदही संपुष्टात येते. अशा वेळी त्याच्या उर्वरित काळासाठी रिक्त पदावर नवीन अध्यक्ष निवडला जातो. प्रभाग समितीची सभा महिन्यातून एक वेळा भरली

जाते.

प्रभाग समितीची कार्ये

१. पाणीपुरवठा, जलनिस्सारण, स्वच्छता, पावसाने तुंबलेल्या पाण्याची विल्हेवाट इत्यादी सेवांच्या संबंधातील नागरिकांच्या समस्या जलद गतीने सोडविणे,

२. प्रभागांशी संबंधित सर्वांच्या अंदाजाबाबतचे अर्थसंकल्पाच्या विविध लेखा शीर्षकाखालील प्रस्ताव आयुक्तांकडे पाठविण्यापूर्वी त्यावर विचार करून शिफारशी करणे. ३. प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रात पार पाडावयाच्या पाच लाख रुपयांपर्यंतच्या खर्चाच्या पालिका बांधकामाच्या नकाशांना प्रशासकीय मान्यता व आर्थिक मंजुरी देणे, अर्थात, महानगरपालिकेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकात त्यासाठी तरतूद केलेली असली पाहिजे. ४. याशिवाय महानगरपालिका वाद्वारे तिला योग्य व आवश्यक वाटतील अशी काही

कामे प्रभाग समितीकडे सोपवू शकते.

४. विशेष व तदर्थ समित्या (Special and adhoe Committees) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये कलम ३० व ३१ मध्ये विशेष व तदर्थ समित्यांची तरतूद केलेली आहे. महानगरपालिका वेळोवेळी विशेष समित्यांची स्थापना करु शकते. महानगरपालिकेच्या सभेत उपस्थित राहून मतदान करणाऱ्या २/३ सदस्यांच्या बहुमताने संमत केलेल्या ठरावाद्वारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित केले जाते. उदा. महिला व बालकल्याण समिती. या समितीचे ७५ टक्के सदस्य हे निर्वाचित महिला पालिका सदस्य असावे लागतात. या समितीच्या अध्यक्षा व उपाध्यक्षा ह्या महिला पालिका सदस्य असतात. बाकी इतर विशेष सभेत असे बंधन नसते.

विशेष समितीचे सदस्य आपल्यातून एकाची सभापती व आणखी एकाची उपसभापती म्हणून निवड करतात. महापालिका सदस्याला एकाच वेळी दोन विशेष समित्यांचे अध्यक्षपद स्वीकारता येत नाही. एका वेळी एकाच विशेष समितीचे सभापती पद स्वीकारता येते. विशेष समितीच्या सभापतीच्या गैरहजेरीत उपसभापती अध्यक्ष म्हणून काम पाहतो. सभापती व उपसभापती एकाच वेळी गैरहजर असतील तर समितीचे उपस्थित सदस्य आपल्यामधून एकाची अध्यक्ष म्हणून निवड करु शकतात.

विशेष समितीचा एखादा सदस्य तिच्या मान्यतेशिवाय दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ गैरहजर राहिला किंवा एखादा सदस्य चार महिन्यांपेक्षा अधिक काळ समितीच्या सभांना मान्यतेसह किंवा मान्यतेशिवाय गैरहजर राहिला तर अशा सदस्याचे सदस्यत्व आपोआपच रद्द होते.

तदर्थ समित्या महानगरपालिका आपल्या सदस्यांतून वेळोवेळी तिला योग्य वाटतील तेवढ्या पालिका सदस्यांचा समावेश असलेल्या तदर्थ समित्या नेमू शकते. अशा समित्यांकडे महानगरपालिका आपणास योग्य वाटतील असे विषय सोपवून त्या विषयासंबंधी चौकशी करण्याचे आणि अहवाल सादर करण्याचे सांगू शकते. महानगरपालिकेच्या पूर्वसंमतीने जे पालिका सदस्य नाहीत अशा व्यक्तींमधून परंतु तदर्थ समितीवर काम करण्यासाठी लागणारी विशेष पात्रता धारण करणारे आहेत अशा दोन व्यक्तींना स्वीकृत सदस्य म्हणून तदर्थ समिती समाविष्ट करून घेऊ शकते. असे सदस्य तदर्थ समितीचे अध्यक्ष होऊ शकत नाहीत. तसेच त्यांना समितीच्या बैठकीत मतदानही करता येत नाही. महानगरपालिकेच्या विशेष समित्या व तदर्थ समित्या यांची एकूण संख्या पाचपेक्षा जास्त असू शकत नाही. महानगरपालिकेचा इतर स्थानिक प्राधिकरण नंबर संयुक्त व्यवहार असेल तर महानगरपालिका संयुक्त समिती स्थापन करु शकते.

निष्कर्ष: - अशा प्रकारे आपल्याला स्थानिक स्वराज्य संस्था या घटकातील महानगरपालिका यामधील स्थायी समिती बाबत माहिती मिळते ताई समितीमार्फत काम होताना दिसते महानगरपालिका यामार्फत विविध कार्य करताना दिसते. महानगर पालिकेचे कार्य स्थायी समितीवर बऱ्याच अंशी अवलंबून असते. जनतेची विविध प्रकारची कार्ये त्याचप्रमाणे जनतेचे समस्या या समितीद्वारे सोडवल्या जातात असे आपल्याला पाहायला मिळते. महानगरपालिके द्वारे होणारा विकास बहुसंख्य वेळा तेथील महानगरपालिकेच्या समित्यांच्या भूमिका वर अवलंबून असतो. पाणीपुरवठा बांधकाम आरोग्य व्यवस्था या गोष्टींचा विकास महानगरपालिकेच्या समित्यांवर अवलंबून असतो. महानगरपालिकेच्या समित्यांनी चांगली भूमिका पार पडली तर तेथील नागरिकांच्या जीवनामध्ये सुधारणा झालेल्या पाहायला मिळतात.

संदर्भसूची:- (१) डॉ. बी. बी. पाटील फडके प्रकाशन पुस्तक.

(२)डॉ. वा. भा. पाटील, स्थानिक स्वराज्य संस्था प्रशांत पब्लिकेशन जळगाव.

(३)Government of Maharashtra – Maharashtra Zilla Parishad and Panachayats Act 1961.

(४)Government of Maharashtra – Municipals Act 1965.

प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की,

(१)अमोघ केशव ताशी,

(२)तृप्ती सचिन सोमुकावर,

(३)पूजा मोहन सोनवणे

(४)आकांक्षा प्रकाश ठाणेकर ,

(५) सौरभ भाऊसाहेब सासने

सदर विद्यार्थ्यांनी राज्यशास्त्र या विषयांमध्ये प्रकल्प सादर केलेला आहे तो प्राचार्य आर आर कुंभार, विभाग प्रमुख दिलीपकुमार पवार सर, प्राध्यापिका समीक्षा फराकटे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे व माझ्या माहिती प्रमाणे हा अहवाल यापूर्वी कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण:- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

दिनांक :

प्राचार्य :-

श्री आर आर कुंभार सर

10/10

मार्गदर्शक:

प्रा. डी. ए. पवार सर

HEAD
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)